अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ८ जानेवारी २०२४ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ८० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## तोतयागिरी केल्याबद्दल सांगोल्यातील महिलेविरूद्ध गुन्हा दाखल

✔ **सांगोला** : येथील शेतकरी महिला सहकारी वस्तनिर्माण सूतगिरणीच्या निवडणुकीसाठी खोटे नाव सांगून बोगस मतदान करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी तिप्पेहळ्ळी (ता. सांगोला) येथील महिलेवर तोतयागिरी केली म्हणून गुन्हा दाखल केला. याबाबत, मतदान केंद्राध्यक्ष मंगेश मनोहर शिंदे (रा. माशाळेनगर, विजापूर रोड)सोलापूर यांनी वंदना शंकरराव जाधव या महिलेविरुध्द फिर्याद दिली आहे.

सांगोला येथील शेतकरी महिला सहकारी वस्त्र निर्माण सूतगिरणी संचालक मंडळाच्या १९ जागेसाठी रविवार ७ जानेवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुजारवाडी, सांगोला येथील ५ बुथवर मतदान प्रक्रिया सुरू होती दुपारी २च्या सुमारास एक महिला मतदान करण्याकरता मतदान केंद्रातील बुथवर आली होती. तिने तिच्याकडील मतदानाबाबतची चिठ्ठी केंद्राध्यक्ष मंगेश शिंदे यांच्याकडे दिली त्यावेळी त्यांनी महिलेस तिचे नाव विचारले असता तिने तिचे नाव वंदना शंकरराव जाधव रा कडलास ता सांगोला असे सांगितले. म्हणून त्यांनी मतदार यादी चेक केली असता या मतदाराचे मतदान झालेले होते त्यांना शंका आल्याने त्या महिलेस मतदान केंद्रावर बंदोबस्तावरील महिला पोलिसांच्या मदतीने सांगोला पोलीस स्टेशन आणले असता पोलीस चौकशी दरम्यान सदर महिलेने तिचे खरे नाव जयश्री विठोबा काळेल (रा.तिप्पेहळ्ळी, ता. सांगोला) असल्याचे सांगितल्याने तिच्यावर खोटे नाव सांगून तोतयागिरी केली म्हणून गुन्हा दाखल केला.

# शाब्दिक हल्ला-प्रतिहल्ला

## कायदा हातात घेणाऱ्यांचा मुलाहिजा ठेवणार नाही

## तू कारवाई कर, तेव्हा मराठे उत्तर देतील

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मराठा आरक्षणावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मराठा आरक्षण आंदोलनाचे मनोज जरांगे -पाटील यांच्यात रविवारी शाब्दिक चकमक झाली.दोघांमध्ये इशारे-प्रतिइशारे झाले.अजित पवारांनी अखेर जरांगेंना कायद्याची समज दिली.मी मुंबईत येणारच असे म्हणून कुणी कायदा हातात घेणार असेल तर त्यांचा मुलाहिजा ठेवणार नाही,अशा निर्वाणीच्या शब्दात अजित पवार यांनी जरागेंना तंबी दिली.ही वार्ता कळताच जरांगे हे भलतेच आक्रमक झाले.पवारांना उत्तर देण्यासाठी ते प्रसार माध्यमांपुढे आले. आरक्षणासाठी सरकार सकारात्मक असताना पवार अशी भूमिका का घेत आहेत? ते अपघाताने सत्तेत आलेला माणूस आहे. तो जर असे बोलत असेल, तर आम्ही त्याला सरकार मानत नाही. मुंबईला जाणार आणि ओबीसीतून आरक्षण मिळवणारच. तू कारवाई कर, तेव्हा मराठेही शांततेत उत्तर देतील,अशा कडक शब्दात जरांगेंनी त्यांना प्रतिउत्तर दिले.**





जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या प्रश्नासाठी २० जानेवारी रोजी 'मुंबईत येणारच' अशी भूमिका घेतली आहे. त्यावरून पवार यांनी टोला लगावला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा रविवारी कल्याण येथे झाला. यावेळी पवार यांनी विविध मुद्यांवर आपली रोखठोक मते व्यक्त केली.

आम्ही विकासासाठी सत्तेत सामील झालो आहोत, असे त्यांनी सुरुवातीला सांगून महाराष्ट्रात सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून चाललेल्या आरोप-प्रत्यारोपावर भाष्य केले. तसेच जितेंद्र आव्हाड यांचे नाव न घेता त्यांनी केलेल्या विधानावर टीका केली. वाचाळविरांची संख्या वाढली आहे. काहीजण विकासाचे बोलण्यापेक्षा नको त्या विषयावर बोलत आहेत, असे पवार म्हणाले.

मराठा आरक्षणाच्या बाबत बोलत असताना अजित पवार म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहीजे, यात कुणाचंच दुमत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझ्यात एकमत आहे. परंतु आज राज्यात ६२ टक्के आरक्षण आधीपासूनच आहे. आता आणखी आरक्षण देण्यासाठी कायदेशीर मार्ग तपासावे लागतील. पण काही लोक टोकाची भाषा वापरत आहेत. मुंबईला येण्यासंबंधी घोषणा करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान देऊन ७५ वर्ष झाली.

आजही त्याच संविधानाच्या आधारावर देश मार्गक्रमण करत आहे. संविधानाने घालून दिलेल्या चौकटीचा आदर झाला पाहिजे. जर कायदा हातात घेण्याचा प्रयत्न कुणी केला, तर त्याचा मुलाहिजा ठेवायचा नाही. कायद्यापेक्षा कुणीही श्रेष्ठ नाही, हेदेखील लक्षात ठेवा,अशा शब्दात त्यांनी इशारा दिला.

### यंत्रणा हलवण्याची ताकत हवी

मागे आम्ही शिवसेनेबरोबर सरकार स्थापन केले होते. शिवसेनेबरोबर करोनाच्या काळात काम करत होतो. त्यावेळी मी सकाळीच ८ वाजता मंत्रालयात जाऊन बसायचो. काही जण म्हटले, करोना झाला तर मराल आणि वर जाल. पण मी म्हटले, मेलो तर मेलो. पण लोकांचे प्रश्न सुटले पाहीजे. मंत्रालयच उघडले नाही, तर प्रशासन ठप्प होईल. चांद्यापासून ते बांद्यापर्यंतची यंत्रणा हलणार नाही. यंत्रणा हलविण्याची ताकद राज्यकर्त्यांमध्ये असावी लागते, असे विधान अजित पवार यांनी केले.

पवारांची टीका ऐकल्यानंतर जरांगे पाटील हे तातडीने मीडियापुढे आले. जालन्यात त्यांनी पवारांच्या टीकेला त्यांनी उत्तर दिले. मराठा समाजाचा सरसकट ओबीसीत समावेश करण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील २० जानेवारीनंतर मुंबईत आमरण उपोषण करणार आहेत. यासाठी आंतरवाली सराटी ते मुंबई पायी प्रवास करत कार्य कर्ते दाखल होणार आहेत.

यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इशारा दिला आहे. मुंबईत येताना कुणी कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केला, तर कारवाई करणार, असे अजित पवारांनी म्हटले होतं. आता मराठा आंदोलक जरांगे-पाटलांनी अजित पवारांचा एकेरी उल्लेख करत आव्हान दिले आहे

ते म्हणाले की, तुम्ही(अजित पवार) आधीपासूनच मराठ्यांच्या मुळावर उठले आहात. तुम्ही आधीपासून हेच केले. तुम्ही मौन धरले होते, त्यामुळे तुम्ही मराठा समाजाच्या पाठीशी असल्याचे आम्हाला वाटले होते. बीडमधील इशारा सभेत मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणाची हाक देणारे जरांगे पाटील सध्या मराठवाड्यातील गावोगावी जाऊन मराठा बांधवांशी संवाद साधत आहे. त्यांच्या दौऱ्याचा रविवारचा चौथा दिवस असून, जालना जिल्ह्यातील दौरा संपवून ते आता बीड जिल्ह्यात दाखल झाले आहे. तर सोमवारी मनोज जरांगे पाटील हे बीड जिल्ह्यातील गोदाकाठच्या गावांमध्ये संपर्क दौरा करणार आहेत. या काळात ते मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनासंदर्भात मराठा बांधवांशी गावागावात जाऊन चर्चा करणार आहेत.

### करोडो मराठ्यांच्या वाटोळं केलं

यावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे-पाटलांनी म्हटलं, शेवटी त्यांनी पोटातले ओठात आणलेच. पहिल्यापासून तुम्ही मराठ्यांच्या विरोधातच काम केलं. दहा ते पाच जणांना जवळ करून बाकी करोडो मराठ्यांच्या वाटोळं केलं. शांततेत येणाऱ्यांवर कारवाई करून दाखवावी, मग मराठेही शांततेत उत्तर देतील.

## शांतात भंग करणाऱ्या सात जणांवर तडीपारीची कारवाई

✔ सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यात सामाजिक शांतता भंग करणारे तब्बल सात जणांवर दोन जिल्ह्यासाठी हद्दपारची कारवाई केली आहे. ही कारवाई उपविभागीय अधिकारी क्रमांक २ चे प्रांताधिकारी विठ्ठल उदमले यांनी केली आहे.

सदर कारवाईमध्ये अक्कलकोट तालुक्यातील सहा तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील एक जणांचे समावेश आहे. सदर गुन्हेगार हे सातत्याने सामाजिक शांतता भंग करणाऱ्या गुन्हेगारांना आळा बसावा म्हणून संबंधित पोलीस ठाण्याचे पोलिसांनी प्रस्ताव सादर केले होते.

त्यावर पुरेशा कागदोपत्र तपासून, आजपर्यंत किती व कोणकोणत्यात्या गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झालेले आहेत. याची पूर्णपणे माहिती घेऊन ही कारवाई केली आहे. दोन जिल्ह्यातून यांना हद्दपार करण्यात आले असून सर्वांना दोन जिल्हे बाहेर पोलिसांनी सोडून आले आहेत.

या आदेशाचे अंमलबजावणी तात्काळ करण्याचे सूचना पोलिसांना देण्यात आले आहे.

यांच्यावर झाली कारवाई संतोष विजापुरे, अजित विजापुरे, प्रमोद मंगरुळे (सर्व रा. गुड्डेवाडी, ता. अक्कलकोट) शाकिर मूर्तज पटेल, नासीर मुर्तुज पटेल (दोघे रा. चपळगाव), ऋतिक सूर्यकांत साळे (रा. भीमनगर अक्कलकोट), मल्लिकार्जुन अप्पासाहेब म्हेत्रे (रा. टाकळी, ता. दक्षिण सोलापूर) असे सात जणांवर सोलापूर, उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतून हद्दपारची कारवाई पुढील दोन वर्षांसाठी करण्याचे आदेश आहेत.

## गुज्झा टेक्सटाईलला भीषण आग; एक कोटींचे साहित्य जळून खाक

✔ सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट रस्ता एमआयडीसीतील गुज्जा टेक्सटाईलला भीषण आग लागून एक कोटीहून अधिक रकमेचे साहित्य जळून खाक झाले आहे.

राजू नारायण गुज्जा यांचा अक्कलकोट रस्ता एमआयडीसीतील प्रिसिजन कंपनी समोर गुज्जा टेक्स्टाईल हा टॉवेल कारखाना आहे. रविवारी कारखान्यातील काम नेहमीप्रमाणे सुरू होते. काही कामगार दुसऱ्या मजल्यावर कामात व्यस्त होते दुपारी अडीच तीनच्या सुमारास कारखान्यात अचानक आग लागली. बघता बघता आग भडकत गेल्याने आगीने रौद्ररूप धारण केले. यावेळी काही कामगार जेवायला गेले होते.

परंतु त्या ठिकाणी असलेले तीन कामगार आगीमुळे अडकून पडले. आगीच्या ज्वाळांमुळे त्यांना खाली येता आले नाही. ही बाब लक्षात येताच इमारतीच्या बाजूने दोन शिडी लावून मालकाच्या मुलाने व अन्य लोकांनी तिघांना सुखरूपपणे बाहेर काढले.



त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. या आगीमध्ये टॉवेल तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल, तयार झालेले टॉवेल, कारखान्यातील मशिनरी, वायरिंग व अन्य साहित्य मोठ्या प्रमाणात आगीच्या भक्षस्थानी पडले.

या आगीची वार्ता समजल्यानंतर पाचही अग्निशामक केंद्रातील पाण्याचे बंब घटनास्थळी दाखल झाले. त्याचप्रमाणे खाजगी पाण्याचे टँकर देखील मागवण्यात आले. सुमारे चाळीस टँकर पाणी मारून अग्निशामक दलाच्या जवानांनी तीन तासानंतर आग आटोक्यात आणली. याआगीमध्ये एक कोटीहून अधिक रकमेचे नुकसान झाल्याचा अंदाज कारखान्याचे मालक राजू गुज्जा यांनी वर्तविला आहे. आग नेमकी कशामुळे लागली, याचे नेमके कारण अद्याप समोर आले नाही.

## लग्न मुहूर्ताअगोदरच चोरट्यांनी साधला दागिने चोरण्याचा मुहूर्त

### तब्बल सहा लाखांचे दागिने लंपास

✔ सुराज्य/अकलूज

सदाशिवनगर (माळशिरस) येथील शिवामृत भवन मंगल कार्यालय या ठिकाणी दोन वधूवर यांचे ५ लाख ५२ हजार २७१ रुपये किमतीचे सोने व चांदीचे दागिने लग्न मुहूर्ताच्या अगोदरच अज्ञात चोरट्यानी लंपास केल्याने विवाह स्थळी गोंधळ निर्माण झाला.

भारत बाजीराव कोळेकर (जळभावी, माळशिरस) यांचे चिरंजीव विनोद आणि उद्धव आप्पासो शेंडगे रा. वाटलूज, ता. दौंड, यांची सुकन्या तृप्ती तसेच भारत बाजीराव कोळेकर रा. जळभावी, ता. माळशिरस यांचे चिरंजीव विष्णू व सुरेश रामचंद्र वाघमोडे रा. बांगर्डे यांची सुकन्या दीप्ती यांचा शुभविवाह शिवामृत भवन मंगल कार्यालय, पुणे-पंढरपूर रोड, सदाशिवनगर येथे दि.०६ जानेवारी रोजी दुपारी ०२.३५ मिनिटे या शुभमुहूर्तावर होणार होता.

विवाह सोहळ्यासाठी आणलेले नववधूंचे दागिने कोळेकर परिवार यांच्याकडे होते. त्यांनी नववधूंना सोन्याचे मंगळसूत्र, गंठण इत्यादी तसेच चांदीची जोडवी, पैंजण असे दागिने केलेले होते. नवरदेव यांना सोन्याच्या अंगठ्या असे सर्व दागदागिने असणारी पिशवी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने लंपास केली आहे. पिशवी गायब झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर शोधाशोध केली. परंतु, दागिने असणारी पिशवी हाती न लागल्याने माळशिरस पोलीस स्टेशन येथे महावीर लक्ष्मण कोळेकर रा. जळभावी यांनी फिर्यादी जबाब देऊन सदरच्या घटनेविषयी तक्रार दाखल केलेली आहे. भारतीय दंड संहिता १९६० कलम ३७९ प्रमाणे माळशिरस पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद झालेला आहे. सदरच्या गुन्ह्यांमध्ये सोने व चांदीचे दागिने एकूण ०५ लाख ५२ हजार २७१ रुपये किमतीचे अज्ञात चोरट्याने लंपास केलेले आहेत. माळशिरस पोलीस स्टेशन सदर गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

## खा.श्रीकांत शिंदे यांना संसदरत्न पुरस्कार



✔ **नवी दिल्ली** : महाराष्ट्रातील कल्याण लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे खा.डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांना यंदाचा संसद रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. १७ व्या लोकसभेत त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. लोकसभेत जनतेच्या प्रश्नावर आवाज उठवणाऱ्या आणि चांगली कामगिरी करणाऱ्या खासदाराला संसदरत्न पुरस्कार देण्यात येतो.

कल्याण लोकसभा मतदारसंघांमध्ये विकासाचा वेगळा पॅटर्न राबवणारे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे लोकसभेतही सर्वच कामकाजात सहभाग घेत असतात. त्यांच्या याच कामगिरीवरून यंदाचा पुरस्कार डॉ. शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे १७ व्या लोकसभेतील सर्वोत्कृष्ट कामगिरी असलेल्या पाच सदस्यांपैकी एक ठरले आहेत. २०१९ ते २०२३या कार्यकाळात डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ५५६ प्रश्न उपस्थित केले आहेत. ६७ चर्चांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे आणि १२ खासगी विधेयक त्यांनी मांडली आहेत.

## चिथावणीखोर भाषणांबद्दल राणे - टी राजांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापुरात शनिवारी रात्री भाजपचे आमदार नितेश राणे आणि तेलंगणातील भाजपचे वादग्रस्त आमदार टी. राजा यांच्यासह इतरांविरूध्द दोन जातींमध्ये विद्वेष फैलावणारे भाषण केल्याबद्दल रविवारी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सोलापुरात शनिवारी (६ जानेवारी) रात्री झालेल्या हिंदू जन आक्रोश मोर्च्याप्रसंगी दोन जाती-धर्मामध्ये विद्वेष फैलावणारे वक्तव्य केल्याचा आरोप झाला. याप्रकरणी भाजपचे आमदार नितेश राणे आणि तेलंगणातील भाजपचे वादग्रस्त आमदार टी. राजा यांच्यासह इतरांविरूध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, हजारोंचा जनसमुदायासह निघालेल्या या मोर्च्याप्रसंगी रस्त्यावर हुल्लडबाजी करून दगडफेकही करण्यात आल्यामुळे पोलिसांनी त्याचीही दखल घेऊन गुन्हा दाखल केला.

वक्फ बोर्ड कायदा रद्द करावा, यसह हिंदुत्वाच्या इतर मुद्यांसाठी सकल हिंदू समाज नावाच्या संघटनेच्यावतीने हिंदू जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून बाळीवेस, टिळक चौक, कन्ना चौक मार्गे कन्ना चौकात हा मोर्चा पोहोचल्यानंतर तेथे झालेल्या सभेत आमदार नितेश राणे व आमदार टी. राजा यांनी दोन जाती-धर्मामध्ये विद्वेष फैलावणारी आणि दुसऱ्या धर्मियांच्या विरोधात चिथावणी देणारी भाषणे केली.

यातून अन्य धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्याचे जेलरोड पोलीस ठाण्यात सहायक फौजदार देवीदास वाल्मिकी यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार आमदार राणे व आमदार राजा आणि सकल हिंदू समाज संघटनेचे समन्वयक सुधाकर बहिरवाडे यांच्यासह सभेच्या व्यासपीठावरील अन्य आठ ते दहा पदाधिकाऱ्यांविरूध्द भारतीय दंड विधान कलम १५३ (अ), २९५ (अ), १८८ सह ३४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

मोर्चा मधला मारूती भागातून कोंतम चौकाकडे येत असताना वाटेत हुल्लडबाजी होऊन रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या काही विशिष्ट दुकानांवर दगडफेक करण्यात आली. दगडफेकीत काही निष्पाप व्यक्तींच्या डोक्याला दुखापत झाली. दुकानांतील साहित्याचेही नुकसान झाले. यासंदर्भातही पोलिसांत अज्ञातांविरूध्द गुन्हा नोंद झाला आहे. याप्रकरणी सतीश शिंदे व शेखर स्वामी या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.





### मोहोळचे उदात्तीकरण

पुण्यात जवळच्या साथीदारांनी हत्या केलेल्या कुविख्यात गुंड शरद मोहोळ याचे सोलापुरातील हिंदू जन आक्रोश मोर्च्याप्रसंगी उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न झाला. शरद मोहोळ याने हिंदू धर्म, देव आणि देशासाठी आयुष्य वेचले. तुळजाभावानी मातेने त्याला आपल्या चरणी जागा द्यावी आणि त्यास पुनर्जन्म देऊन पुन्हा हिंदू धर्माच्या रक्षणासाठी पाठवावे, असे तेलंगणातील भाजपचे वादग्रस्त आमदार टी. राजा सोलापूरच्या सभेत म्हणाले.टी. राजा यांनी शरद मोहोळचे गोडवे गात त्यास श्रध्दांजली अर्पण केली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुम्ही आनंदात आहात म्हणजे तुमच्या सगळ्या पेशी स्वस्थ आहेत.